## जाहीर नोटीस

सर्व जनतेस ह्याद्वारे कळविण्यात येते की, गांव पडई, महसूल विभाग कोफराड ता. वसई, जि. पालघर, येथील श्री. आगुस्तीन इग्नेशियस घोन्सालविस व श्रीमती लुईजा आगुस्तीन घोन्सालविस, ह्यांचे घर, वसई-विरार शहर महानगरपालिका, कोफराड विभाग येथील मालमत्ता क्र. २०८(१) व २०८(२) तळमजला + पहिला मजला असा आहे.

श्री. आगुस्तीन इग्नेशियस घोन्सालविस व श्रीमती लुईजा आगुस्तीन घोन्सालविस ह्यांनी वर उल्लेखित मालमत्ता बॅसिन कॅथलिक बँक, नंदाखाल शाखा येथे तारण ठेवून कर्ज मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. तरी सदर मिळकतीचे तारणापोटी श्री. आगुस्तीन इग्नेशियस घोन्सालविस व श्रीमती लुईजा आगुस्तीन घोन्सालविस ह्यांस बॅसिन कॅथलिक बँक, नंदाखाल शाखा येथून कर्ज देण्यास कोणाही व्यक्ति, शासकीय प्राधिकरण, बँका, वित्तीय संस्था इ. ज्यांचा गहाण, बक्षीस, विक्री, कब्जा वारसाहक्क, भाडेपट्टा, परवाना धारणाधिकार, अदलाबदल, देखभाल, प्रभार, विश्वस्त, करार, शेअर, सुविधाधिकार किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने मालमत्ता क्र. २०८(१) व २०८(२) किंवा सदर मिळकतीतील कोणत्याही भागासाठी किंवा विरोधात कोणताही दावा असल्यास सदर तारखेपासून १४ दिवसांत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय ऑफिस नं. २, सुप्रिम बिल्डींग, डांगे टॉवरच्या मागे, फ्लायओव्हर ब्रिज जवळ, नालासोपारा (प.), ४०१ २०३, येथे लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा कोणाचा कोणताही हक्क नाही व असल्यास सदरचा हक्क त्यांनी सोडून दिलेला आहे असे गृहित धरून आमचे अशिलांना सदर मिळकत निर्विवाद बोजाविरहित असल्याबाबतचा दाखला (Title clearance Certificate) देण्यात येईल. कागदोपत्री पुराव्याविना आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०६/२०१७ सही/-
ॲड. रिना एस. रॉड्रीग्ज, वकील

## मुंबई येथे लघुवाद न्यायालयातील
### आर.ए.ई. वाद क्र. १९४० सन २०१६

१. शिवनारायण बक्षीराम नेमानी ट्रस्ट, प्रायव्हेट फॅमिली ट्रस्ट, ज्याचा पत्ता येथे ७२, नेमानी बिल्डिंग, एन. एस. पाटकर मार्ग, मुंबई – ४०० ००७.
२. श्री. जयकुमार मदालाल नेमानी वय ७८ वर्षे, पेशा : व्यवसाय, ७२, नेमानी बिल्डिंग, एन. एस. पाटकर मार्ग, मुंबई – ४०० ००७.
३. श्री. अनुपम ब्रिजमोहन नेमानी वय ५८ वर्षे, पेशा : व्यवसाय, ७२, नेमानी बिल्डिंग, एन. एस. पाटकर मार्ग, मुंबई – ४०० ००७.
४. श्री. शरदकुमार केशवदेव नेमानी वय ७० वर्षे, पेशा : व्यवसाय, ७२, नेमानी बिल्डिंग, एन. एस. पाटकर मार्ग, मुंबई – ४०० ००७.
५. डॉ. मंजुला रामबल्लभ नेमानी वय ७० वर्षे, पेशा : व्यवसाय, ७२, नेमानी बिल्डिंग, एन. एस. पाटकर मार्ग, मुंबई – ४०० ००७.

....वादी

**विरुद्ध**

१. सुशिलकुमार जालन (पूर्ण नाव ज्ञात नाही) पुरुष, वय : प्रौढ, पेशा : व्यवसायिक, ज्यांचा अंतिम पत्ता १ ला मजला, २१०/२१२, नेमानी बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई ४०० ००२
२. श्री. रमेशकुमार जालन (पूर्ण नाव ज्ञात नाही) पुरुष, वय : प्रौढ, पेशा : व्यवसायिक, ज्यांचा अंतिम पत्ता २ रा मजला, २१०/२१२, नेमानी बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई ४०० ००२
३. श्री. कैलाश आर. रूंगता (पूर्ण नाव ज्ञात नाही) मे. श्री जगन्नाथ टेक्सटाईल्स याचे मालक पुरुष, वय : प्रौढ, पेशा : व्यवसाय, ज्यांचा पत्ता २ रा मजला, २१०/२१२, नेमानी बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई ४०० ००२

...प्रतिवादी

प्रति,
वरील नमूद प्रतिवादी क्र. १ आणि २,

**ज्याअर्थी** वरील नमूद वादी यांनी प्रतिवादींविरुद्ध वरील वाद दाखल केला असून आज्ञा केली आहे की, वादग्रस्त परिसर असा दुसरा मजला, २१०/२१२, नेमानी बिल्डिंग, काळबादेवी रोड, मुंबई ४०० ००२ हा वादींना अर्जातील आज्ञेप्रमाणे अशा इतर आणि पुढील अनुतोषांकरिता सदरचा मोकळा आणि शांततापूर्ण कब्जा सुपूर्द करण्यासाठी प्रतिवादींना आदेश आणि वादींद्वारे हुकूमनामा द्यावा.

सदर समन्सच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांत सदर न्यायालयात लिखित विवरण तुम्हाला दाखल करणे वरील नमूद प्रतिवादी तुमची जबाबदारी आणि आदेश आहे आणि व्यक्तिशः किंवा रितसर सूचित प्राधिकृत प्लीडरद्वारे न्यायालय खोली क्र. २६, २ रा मजला, न्यू ॲनेक्स बिल्डिंग, लघुवाद न्यायालय, एल.टी.मार्ग, मुंबई – ४०० ००२ मधील पीठासिन सन्मा. न्यायमूर्ती यांच्या समक्ष दिनांक ३० जून, २०१७ रोजीस दु. २.४५ वा. वरील नमूद वादींना, तुमचे दुर्लक्ष किंवा वादींचा मासिक टेनंट म्हणून तुमचा ज्यावर कब्जा होता आणि ज्याची टेनंसी निर्धारित झाली आहे त्या वादग्रस्त परिसराचा कब्जा त्यांना देण्यात आणि सोडण्यास मनाई केल्याबाबत वादाला उत्तर देण्याकरिता उपस्थित राहायचे आहे आणि सूचना घ्यावी की, जर तुम्ही तुमचे लिखित विवरण दाखल केले नाही किंवा सदर न्यायालयात उपस्थित राहिला नाहीत आणि तुम्ही उपरोक्त सदर परिसराचा कब्जा देण्यात तुम्ही का भाग पडला नाहीत त्याबाबत कारणे दाखविली नाहीत, तर सदर न्यायालयाच्या आदेशाद्वारे तुम्हाला सदर कब्जा द्यावा लागणार आहे.

सदर वादाची प्रत तुम्ही सदर सन्मा. न्यायालयाच्या न्यायालय खोली क्र.२६ येथून प्राप्त करू शकता.

खाली न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.
सदर २२ मार्च, २०१७
सही/-
प्रबंधक

## ZENITH SECURITIES AND INVESTMENT LIMITED

Registered Office: Mehta House, Mumbai Samachar Marg, Mumbai-23
CIN: U66010MH1916GOI000432

***NOTICE***

Notice is hereby given to shareholders of the Company pursuant to Rule 6 of the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016, notified by the Ministry of Corporate Affairs which came into effect from September 07, 2016 and amended as Investor Education and Protection Fund Authority (Accounting ,Audit, Transfer and Refund) Amendment Rules, 2017 effective from February 28, 2017.

Pursuant to the said Rules / Amendments, all shares with respect to which dividend(s)have not been claimed or remain unpaid, for a period of seven consecutive years or more, shall be transferred to the Investor Education Fund (IEPF).

Hence, all the underlying shares in respect of which dividend(s) have not been claimed/paid for the last seven years from the financial year 2008-2009 shall be transferred to the IEPF Authority.

As per the said Rules, where the period of seven years provided under sub-section (5) of section 124 has been completed or being completed during the period from September 07, 2016 to May 31, 2017, the due date of transfer of such shares shall be deemed to be May 31, 2017. The Ministry of Corporate Affairs vide its notification dated May 29, 2017 issued a clarification with respect to due date for transfer of shares to IEPF Authority stating that the modalities for transfer/ transmittal of shares from Companies accounts to demat account of IEPF Authority is being finalized and till opening of such demat accounts by IEPF Authority "the due date for transfer of shares stands extended."

The Company has sent individual notices through registered post to the latest available addresses of the shareholders whose dividend(s) are lying unclaimed since the last 7 consecutive years, advising them to claimthe dividend(s) expeditiously. Accordingly, concerned shareholders are requested to reply and claim their unclaimed dividends by forwarding the requisite documents as mentioned in the said communication to Zenith Securities and Investment Limited located at Mehta House, Mumbai Samachar Marg, Mumbai - 400023, Tel No.: 9833490509, e-mail : zensecinv@yahoo.com not later than June 30,2017 or such extended date until modalities for transfer/ transmittal of shares from Companies accounts to demat account of IEPF Authority are finalized and opening of demat accounts by the IEPF Authority.

In absence of any communication from the concerned shareholder(s) until the last date provided above, the Company shall proceed to transfer the shares to IEPF by issuing duplicate share certificate(s) in accordance with the said Rules. Shareholders may note that shares transferred to IEPF, including all benefits accruing on such shares (except rights issue), if any, can be claimed by the concerned shareholder by filing Form IEPF-5 in accordance with the Rules, further details available on www.iepf.gov.in. Please note that no claims shall lie against the Company in respect of unclaimed dividend(s) and shares transferred to IEPF pursuant to the said Rules.

For **Zenith Securities and Investment Limited**
**Homi Mehta**
Director
(DIN: 00105524)

## HDFC BANK
We understand your world

### एचडीएफसी बँक लिमिटेड

**नोंद. कार्यालय:** एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०० ०१३.
(कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर – एल६५९२०एमएच१९९४पीएलसी०८०६१८)
(ई–मेल: shareholder.grievances@hdfcbank.com) (संकेतस्थळ :www.hdfcbank.com)
(दूर. : +९१–०२२–२४९८ ८४८४; एक्स. : ३६२१ आणि ३४६३, फॅक्स : +९१–०२२–२४९६५२३५)

**सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, एचडीएफसी बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाची सभा ३० जून, २०१७ रोजी संपणारे तिमाही अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात घेण्याकरिता सोमवार, दि. २४ जुलै, २०१७ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

सदर सूचना ही नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे संकेतस्थळ **https://www.nseindia.com/live_market/dynaContent/live_watch/get_quote/GetQuote.jsp?symbol=HDFCBANK&illiquid=0&smeFlag=0&itpFlag=0** आणि बीएसई लिमिटेड **http://www.bseindia.com/corporates/anndet_new.aspx?newsid=32ab81d4-279b-4038-8f46-1fc07810b3f4** येथे उपलब्ध आहे. बँकेचे संकेतस्थळ www.hdfcbank.com यावर सुद्धा उपलब्ध असणार आहे.

एचडीएफसी बँक लिमिटेडकरिता
सही/-
संजय डोंगरे
मुंबई, २० जून, २०१७ कार्यकारी उपाध्यक्ष (कायदा) आणि कंपनी सचिव

## देना बँक DENA BANK
(A. Govt. of India Enterprise)

**वाशी सेक्टर –६ शाखा**
शॉपिंग सेंटर, सेक्टर क्र. ६, वाशी, नवी मुंबई– ४०० ७०३, जि. ठाणे
दूरध्वनी क्र. ०२२–२७८२०२८९, २७८२४३७३,
ई–मेल : vashi@denabank.co.in

प्रति, दिनांक : २४.०४.२०१७

**१) श्रीम. बनवा हिदायत खान**
**श्री. हिदायत एच. खान**
फ्लॅट क्र. १६०१, साई अंश सीएचएस लि., प्लॉट क्र. ७, सेक्टर ११, सानपाडा, नवी मुंबई – ४०० ७०५.
**२) श्री. हिदायत हुसेन खान**
**संचालक, रायान कॉर्पोरेशन प्रा. लि.**
गाळा क्र. १३०१, रियल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.

महोदय/महोदया,

**संदर्भ: वाशी सेक्टर –६ शाखा, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३ यांच्याकडील पत सुविधा, श्रीम. बनवा हिदायत खान आणि श्री. हिदायत एच. खान खाते क्र. ०६५८५१०२४११२ मधील सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३(१३) सहवाचता कलम १३(२) अन्वये सूचना**

देना बँक, वाशी सेक्टर – ६ शाखेने मुदत कर्ज (गहाण) पत सुविधा मंजूर केलेली आहे ज्याचा परतावा सुरक्षित करण्यासाठी तुम्ही विविध कर्ज दस्तावेज निष्पादित केलेले आहेत. ही सुविधा **देना बँक, वाशी सेक्टर–६ शाखेद्वारे** फ्लॅट क्र. १६०१, साई अंश सीएचएस लि., प्लॉट क्र. ७, सेक्टर ११, सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५ मिळकतीच्या समतुल्य गहाणाच्या मार्गाने प्रामुख्याने/सांपार्श्विक तारण आहे. पत सुविधेसह थकबाकी आणि प्रामुख्याने/ सांपार्श्विक तारणाचा तपशील येथे खाली देण्यात आला आहे.

वरील शाखेने तुमच्या विनंतीवरुन खालील पत सुविधा वाढवून दिल्या आहेत. पत मर्यादा आणि प्रत्येकी पत सुविधेसमोरील थकबाकी खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | मर्यादेचा प्रकार | मंजूर मर्यादा | ३१/०१/२०१७ रोजीस व्याजासह थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मुदत कर्ज (देना गहाण कर्ज स्कीम) | रु. ७०,००,०००/- | रु. ४५,५७,६६७/–+ १३.४५ प्र.व. दराने विना आकार व्याज + लागू दरावर आणि २% दराने दंडात्मक व्याज |

**तारण : श्रीम. बनवा हिदायत खान आणि श्री. हिदायत एच. खान यांच्या नावे उप–प्रबंधक ठाणे – ३ यांच्या मर्यादेत मोजमापित जवळपास ९४५.३७ चौ. फू. बिल्टअप असणाऱ्या निवासी फ्लॅट क्र. १६०१, साई अंश सीएचएस लि., प्लॉट क्र. ७, सेक्टर – ११, सानपाडा, नवी मुंबई – ४०० ७०५ असणाऱ्या परिसराच्या त्या सर्व भागाचे समतुल्य गहाण.**

वरील सदर वित्तीय सहाय्याचे परिचालन आणि चालवणे अनियमित बनले आहे आणि मुद्दल कर्ज आणि त्यावरील व्याजाचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केल्यामुळे कर्ज दिनांक ०१/०१/२०१२ रोजीस रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नॉन परफॉर्मिंग असेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. एनपीएची तारीख ३१/०३/२०१७ आहे. अशा परिस्थितीमुळे देना बँकेने अग्रिमा परत मागविण्याचे ठरविले आहे.

निम्नस्वाक्षरीकार यांची सरफैसी ॲक्ट, २००२/सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स,२००२ च्या तरतुदींनुसार बँकेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणून यथायोग्य नियुक्ती करण्यात आली आहे.

निम्नास्वाक्षरीकारांनी सदरहू अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून साठ (६०) दिवसात ३१.०३.२०१७ रोजीसची **रु. ४५,५७,६६७/–** सह प्रदानापर्यंत द. सा. संविदात्मक दराने पुढील व्याज आणि २% दराने दंडात्मक आणि अनुषंगिक खर्च/दर या रकमेचे बँकेचे संपूर्ण दायित्व सोडविण्यासाठी तुम्हाला संयुक्तपणे आणि वेगवेगळे बोलावणे करत आहेत, कसूर केल्यासा सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) च्या तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तारण मत्ता ज्यामधील तारण हितसंबंधावर कार्यवाही करण्यास कार्यवाही करण्यात इच्छुक आहेत तिचा तपशील वर नमूद करण्यात आला आहे.

तुम्हाला पुढे बँकेची लेखी सहमती प्राप्त केल्याशिवाय सदर सूचनेत नमूद सदर तारण मत्तेच्या कब्जासह (व्यवसायाचा सर्वसाधारण भाग वगळून) विक्री/भाडेपट्टा किंवा अन्यथा मार्गाने हस्तांतर करण्यापासून सदरहू अधिनियमाच्या कलम १३(१३) अन्वये प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर सूचना ही कार्यवाही करतेवेळी कोणत्याही अन्य कायद्याच्या तरतदींन्वये योग्य आणि आवश्यक मानल्यानुसार कोणतीही अन्य कायदेशीर प्रक्रिया/कार्यवाही करण्यासाठी तारण धनकोंच्या हक्काला बाधा येऊ ने देता देण्यात येत आहे.

बँकेने इतर अनुषंगिक दायित्वे तसेच तुमच्या वतीने जारी बिल्स डिस्काऊंटेड/बँक गॅरेंटी/ एल/सी इ. अन्वये भविष्यात निर्माण होणारी दायित्वे चुकती करण्यासाठी तुम्हाला बोलाविण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

**सही/–**
**जे. एस. निजासुरे**
**(मुख्य व्यवस्थापक), प्राधिकृत अधिकारी,**
**देना बँक, वाशी सेक्टर–६, शाखा**

## जाहीर नोटीस

सदर नोटिसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे उमरोळी, ता. व जि. पालघर येथील स.नं. १००, हि.नं. ...., क्षेत्र ०–१९–७० (हे.आर), आकार १–५२ (रु. पैसे), यापुढे संक्षिप्तेसाठी ''सदर मिलकत'' असे संबोधण्यात आलेले आहे. सदर मिळकत अशोक नारायण पाटील व इतर, राहणार–उमरोळी, बोईसर, ता. व जि. पालघर यांचे मालकी कब्जेवहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशील व जमीन मालक यांनी एकत्रितपणे विकसीत करावयाचे ठरविलेले आहे. तरीही, सदर मिळकतीबाबत कोणत्याही स्वरुपाची हरकत, अधिकार, वहिवाट, शेअर, विक्री, गहाण, लिज, परवाना, बक्षीस, कब्जा, बोजा असल्यास तसे लेखी योग्य त्या पुराव्यासकट खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आजपासून १४ दिवसांचे आत कळवावे. अन्यथा आपला काहीह हक्क नाही व तो असल्यास आपण सोडला आहे असे समजून सदर मिळकत विकसित केली जाईल याची नोंद घ्यावी.

विकासकाचे वकील
एम.एस. रॉड्रीग्ज,
२/१०, कपिलकुंज, वसई रोड (प.)

## NOTICE

Notice is hereby given on 21st June, 2017 that documents of Flat No. 25 allotment letter and Share Certificate No. 89 bearing Distinctive Nos. from 441 to 445 of Pragati Co-op. Hsg. Society Limited situated at CTS No. 122, 122/1-18 Survey No. 14 (Part) of Village Chembur near Kurla Flyover Bridge and E.E. Highway, Chembur, Mumbai-400 071 in the name of Late Shri Anand Janaji Shinde has been reported Lost/Misplaced and an application has been made by wife widow of Late Shri Anand Janaji Shinde that is Smt. Asha Anand Shinde to the Society for issue of Duplicate Share Certificate and Allotment Letter.

The Society hereby invites claims or objection (in writing) for issuance of the Duplicate Share Certificate and allotment letter within the period of **14 (Fourteen) days** from the date of publication of this notice. If no claims/objection are received during the period the society shall be free to issue Duplicate Share Certificate and Allotment Letter.

For Pragati Co-op. Hsg. Society Ltd.
**Sd/-**
**Suhas Sarode**
Secretary

## सूचना

जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्रीमती अमिरबानू मोहमदअली आमलानी** यांनी हरवलेल्या किंवा सापडत नसलेल्या फ्लॅट क्र. ५१, **सबर्बन गोल्डन पॅलेस सीएचएस लि.**, टर्नर रोड, वांद्रे (प), मुंबई ४०००५० शी संबंधित विभिन्न क्र. १४१ ते १४५ धारक प्रत्येकी ५०/– च्या ५ संपूर्ण भरणा झालेल्या शेअर्ससाठी मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. २९ च्या बदल्यात नक्कल शेअर प्रमाणपत्र जारी होण्यासाठी सोसायटीकडे एक पत्र लिहिले. जनतेने कृपया वरील बाबतीत त्यांचे कोणतेही भार किंवा दावे असल्यास ह्या सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांत सोसायटीचे मानद सचिव निम्नस्वाक्षरीकारांकडे पुष्ठ्यर्थ दस्तावेजांसह रजिस्टर्ड एडीने एक पत्र लिहून ते नोंदवावेत, कसूर केल्यास सोसायटी श्रीमती अमिरबानू मोहमदअली आमलानी यांना एक नक्कल शेअर प्रमाणपत्र जारी करण्याचा निर्णय घेईल.

**सबर्बन गोल्डन पॅलेस सीएचएस लि.**साठी
**सही/–**
**अशोक रंगानी**
मानद सचिव
मुंबई दिनांक २१ जून, २०१७.

## ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इन्डिया) लि.(आर्सिल)

Arcil
Premier ARC

**सन ऑप्टीकल मास्टरींग प्रा. लिमिटेड** च्या वित्तिय मत्तांच्या संबंधातील विश्वस्त संस्थेचे विश्वस्त म्हणुन आपल्या क्षमतेमध्ये कार्य करणारी कंपनी
आर्सिलचे कार्यालय:– दि रुबी, १० वा मजला, २९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई – ४०० ०२८,
वेबसाईट : **www.arcil.co.in**

### विक्रीसाठी सूचना

सन ऑप्टीकल मास्टरींग प्रा. लिमिटेडच्या **"जेथे आहे आणि जसे आहे"** या तत्वावरील तारणयुक्त मत्तांची (सेक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेट्स ॲंड एन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफैसी अधिनियम) च्या तरतुदींसह वाचता सेक्युरिटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ चा नियम ८(५) (डी) आणि नियम ९ अन्वये तारणयुक्त मत्तांची विक्री (जिचा सरफैसी अधिनियमाचे कलम १३(४) अन्वये ताबा घेण्यात आलेला आहे)

१. **कर्ज घेणाऱ्याचे नाव:– सन ऑप्टीकल मास्टरींग प्रा. लिमिटेड**
२. **मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम.**

| अनु. क्र. | मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु.) कोटी |
|---|---|---|
| १ | ग्लोबल चेंबर बिल्डिंग , इन्फीनीटी मॉल समोर, धीरज हाईट्स जवळ, ऑफ लिंक रोड, आदर्श नगर, अंधेरी (प), मुंबई ४०००५३ येथील सुसज्ज व्यावसायिक जागा क्र. ४०१, ४०२ आणि ४०३ एकत्रित चौथ्या मजल्यावर स्थित १६३०.९६+१८६४+२७३.७३ चौ.फु.बांधीव जागा एकुण ३,७६८.६९ स्के.फी. पर्यंत | ४,६०,००,०००/– (रु.चार कोटी साठ लाख) |

३. आर्सिल/बँक यांना **दिनांक मे २९ मे २०१४** अनुसार कर्ज घेणाऱ्याची उर्वरित रक्कम **रु.२७,०७,४४,९९६/–** (**रु.सत्तावीस कोटी सात लाख चव्वेचाळीस हजार नवशे शहण्णव** फक्त) व दिनांक **३० मे २०१४** पासुन प्रदानपर्यंत दस्तावेजी दराने व्याज आणि इतर रकमासहीत.

या द्वारे कळविण्यात येते की उपरोक्त उल्लेख केलेल्या मालमत्तेची विक्री गेल्या **०८ फेब्रुवारी २०१७** पासुन अनेक वेळा सार्वजनिक पद्धतीने करण्यात चालू आहे. परंतु ती बोलीच्या मागणीसाठी अयशस्वी ठरली.

उक्त मालमत्ता आता वर नमुद केलेल्या आरक्षित किमतीनुसार खाजगी करारानुसार विकली जात आहे. विक्री **०६ जुलै २०१७** रोजी किंवा त्यानंतर **रुबी, १० मजला, २९ सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई २८** स्थित आर्सिल कार्यालयात आयोजित केली जाईल.

वर उल्लेख केलेल्या मालमत्तेच्या सर्व ज्ञात / अज्ञात भारांची विक्री केली जात आहेत.

ही सूचना कर्जघेणारे / हमीदार / तारणकार / गहाणकार यांना दि सेक्युरिटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ चे नियम ८ आणि नियम ९ अन्वये देण्यात आलेली १५ दिवसांची सूचना आहे असे समजण्यात यावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१ जून २०१७

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इन्डिया) लि.**

## दी भारत को– ऑप. बँक (मुंबई) लि.
### (मल्टी–स्टेट शेड्युल्ड बँक)

मध्यवर्ती कार्यालय: 'मरुतागिरी', प्लॉट क्र. १३/९ ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०००६३, दू.:– ६१८९००८८/६१८९०१३४/६१८९००८५

### लिलाव सूचना
**स्थावर मिळकतींची लिलाव विक्री**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (४) प्रमाणे **दी भारत को–ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.** च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या आता कब्जात असलेल्या खालील स्थावर मिळकतीची **''जसे आहे जेथे आहे तत्त्वाने''** व **''जसे आहे जे आहे तत्त्वाने''** खरेदीसाठी जनता/इच्छुक बोलीदार यांचेकडून मोहोरबंद प्रस्ताव/निविदा मागविण्यात येत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

ए) तालुका आणि नोंदणी उप–जिल्हा पनवेल आणि नोंदणी जिल्हा रायगडच्या ग्रामीण भागातील नगरपरिषदेच्या हद्दीबाहेरील आणि पालेखुर्द गाव हद्दीतील तळोजा इंडस्ट्रिअल एरियामधील ५००० चौ.मी. मोजमापित प्लॉट क्र. एम–१७ अशा ज्ञात जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग सह एकत्रित त्यावर बांधलेली तळ अधिक दोन मजल्यांचा समावेश असलेली इमारत एकूण क्षेत्र मोजमापित ५४९१.५५ चौ.मीटर्स व पुढीलप्रमाणे सीमाबध्द: उत्तरेस किंवा त्या दिशेस: प्लॉट क्र. एम–१६ व खाजगी जमीन, दक्षिणेस किंवा त्या दिशेस: प्लॉट क्र. एम–१८, पूर्वेस किंवा त्या दिशेस: खाजगी जमीन, पश्चिमेस किंवा त्या दिशेस: इस्टेट रोड.
बी) प्लॉट आणि मशिनरीज

| | |
|---|---|
| **तारण धनकोंचे नाव आणि पत्ता** | **दी भारत को–ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि. नोंदणीकृत कार्यालय:** मोहन टेरेस, ६४/७२, मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई–४०० ००१. **मध्यवर्ती कार्यालय :** मरुतागिरी, प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६३. **(दू. : ६१८९००८८/६१८९०१३४)** |
| **गहाणकारांचे/ कर्जदारांचे नाव** | **मे. सुमाराज सीफूडस् प्रा.लि. (वाशी शाखा)** |
| **थकीत रक्कम** | मे. सुमाराज सीफूडस् प्रा.लि.च्या कर्ज खात्यासंबंधात ०१.०७.२०१६ पासून संविदात्मक दराने पुढील व्याज आणि खर्च, आकार आणि परिव्यय यासह दिनांक ०५.०७.२०१६ च्या मागणी सूचनेप्रमाणे ३०.०६.२०१६ रोजीसची एकूण थकबाकी रु. ४१,०६,२५,६५४/– |
| **राखीव किंमत** | **रु. १६,००,००,०००/– (रुपये सोळा कोटी मात्र) (राखीव किंमतीखाली असलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत)** |
| **इसारा अनामत रक्कम (अयशस्वी बोलीदारांना परत केली जाईल)** | निविदा/प्रस्तावासोबत **दी भारत को–ऑपरेटिव्ह बँक (मुंबई) लि.** खाते **मे. सुमाराज सीफूडस् प्रा.लि.** यांच्या नावातील डीडी/पीओने रु. ५०,००,०००/– (रुपये पन्नास लाख) |
| **मिळकतीचे निरीक्षण** | **१०.०७.२०१७ रोजी स. ११.०० ते सं. ५.००** किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांशी आगाऊ ठरवून अन्य तारीख व वेळी |
| **निविदा/प्रस्ताव दाखल करण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण** | मोहोरबंद निविदा/प्रस्ताव प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे **२०.०७.२०१७** रोजी **सं. ५.००** किंवा त्यापूर्वी मध्यवर्ती कार्यालय, लिगल अँड रिकव्हरी डिपार्टमेंट, मरुतागिरी, प्लॉट क्र. १३/९ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६३ येथे सादर कराव्यात. |
| **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ** | **२१.०७.२०१७ रोजी स.११.३० वा.** मध्यवर्ती कार्यालय – लिगल अँड रिकव्हरी डिपार्टमेंट, मरुतागिरी, प्लॉट क्र. १३/९ ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६३. |

(१) अंतिम विक्री मोबदला रकमेच्या १% दराने टीडीएसची रक्कम खरेदीदारांनी भरावयाची आहे आणि बँकेला खरेदीदारांनी संपूर्ण मोबदला रक्कम प्रदान करावयाची आहे.
(२) दस्तावेजांसाठीचे आकार, सोसायटी महसूल खात्याची हस्तांतरण फी, अभिहस्तांतरण, मुद्रांक शुल्क, नोंदणीचे प्रयोज्य हस्तांतरण निबंधकांकडील आकार आणि अन्य कोणतीही वैधानिक देणी खरेदीदारांनी भरावयाची आहेत आणि खरेदीदारांनी हस्तांतरण औपचारिकता पूर्ण करायच्या आहेत.
(३) कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा आणि/किंवा निविदा उघडण्याची किंवा विक्री निश्चितीची तारीख आणि वेळ पुढे ढकलण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवत आहेत.
(४) गहाणकार/कर्जदार संभाव्य बोलीदार/प्रस्तावकर्ते आणू शकतात आणि **२१.०७.२०१७** रोजी **स. ११.३० वा.** प्रस्ताव उघडतेवेळी हजरही राहू शकतात.
(५) यशस्वी बोलीदार/प्रस्तावकर्त्यांना २५% बोली रक्कम ताबडतोब आणि उर्वरित रकमेला निविदा उघडण्याच्या तारखेपासून १५ दिवसांत जमा करावे लागेल.
(६) जर प्रस्ताव उघडल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत उर्वरित ७५% बोली रक्कम प्रदान करण्यात यशस्वी बोलीदारांनी कसूर केली तर जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल.

**सरफैसी ॲक्टच्या नियम ८(६) अंतर्गत वैधानिक सूचना**

**सदर सूचना ही वरील कर्जाच्या कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांना सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ८(६) अन्वये, वरील तारखेस त्याच्या/त्यांच्या संपूर्ण थकबाकीचे प्रदान न केल्यास उपरोक्त तारण मत्तेच्या विक्रीकरिता सर्वसामान्य जनतेकडून मोहोरबंद निविदा मागवून विक्री करण्याबाबत देखील सूचना आहे. विक्रीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी वरील रकमेचे प्रदान करण्यासाठी तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते, कसूर केल्यास मिळकत विकली जाईल आणि उर्वरित थकबाकी, जर असल्यास ती तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल.**

**दिनांक : २१.०६.२०१७**
**ठिकाण : मुंबई**

**रघु पुजारी**
**उप महाव्यवस्थापक**
**आणि प्राधिकृत अधिकारी**

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील श्री. विजयराज छाब्रिया हे कायदेशीर मालक/सदस्य म्हणजेच १) श्री. शशिकांत जी. मेहता आणि २) श्रीम. रुपा शशिकांत मेहता यांच्याकडून जे निवासी फ्लॅट ज्याचा फ्लॅट क्र. ७, ४ था मजला, ए विंग, दौलत विहार को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, ५६/५७, दादाभाई रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०५६, मोजमापित १३९२ चौ. फू. बि./अप क्षेत्र किंवा च्याआसपास असून सदरसंदर्भातील कायदेशीर आणि खरेखुरे अधिकार, नामाधिकार, हितसंबंध आणि शेअर (म्हणजेच ५०% प्रत्येकी) च्यासह शेअर प्रमाणपत्र क्र. ७, जे क्र. ३१ ते ३५ दिनांक २८/१०/१९७४ असणाऱ्या ५ (पाच) शेअर्सकरिता निर्गमित असून सदर जे खालील परिशिष्टात अधिक सविस्तररित्या वर्णन केले असून, सदर फ्लॅटचा यापुढे **"सदर मिळकत"** असा उल्लेख केला जाणार असून सदर खरेदी करण्यास तयार झाले आहेत.

कोणत्याही व्यक्ती/व्क्तींना कोणताही आक्षेप किंवा कोणताही दावा, अधिकार, नामाधिकार किंवा हितसंबंध असल्यास जसे विक्री, गहाण, अदलाबदल, भेटवस्तू, धारणाधिकार, प्रभार, भाडेपट्टा, सुविधाधिकार, निर्वाह, वारसाहक्क, विश्वस्त किंवा अन्य कुळवहिवाट/परवाना सदर मिळकतीसंदर्भात किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत असल्यास सदर लिखित स्वरुपात पुराव्यांच्या संबंधित दस्तावेजांसह निम्नस्वाक्षरीकारांस त्यांचे कार्यालय येथे २०३, वर्धमान चेंबर्स, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई – ४०० ००१ येथे सदर प्रकाशनाच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास सदर मिळकतीसंदर्भातील दावा किंवा दावे असल्यास त्याचा त्याग केल्याचे आणि/किंवा सोडून दिल्याचे आणि/किंवा अधित्याग केल्याचे मानले जाईल आणि सदर दावा/दावे असल्यास त्याचा अधित्याग केल्याचे मानले जाईल आणि माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

**वरील उल्लेखित परिशिष्ट**
**(सदर मिळकत)**

**तो सर्व** फ्लॅट परिसर ज्याचा फ्लॅट क्र. ७, ४ था मजला, ए विंग, दौलत विहार को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नामक इमारतीत, ५६/५७, दादाभाई रोड, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०५६, मोजमापित १३९२ चौ. फू. बि./अप क्षेत्र किंवा च्याआसपास च्यासह शेअर प्रमाणपत्र क्र. ७, जे क्र. ३१ ते ३५ दिनांक २८/१०/१९७४ असणारे ५ (पाच) शेअर्स निर्गमित केले असून सदर वसलेले आणि स्थित गाव विलेपार्ले, तालुका अंधेरी जे मुंबई उपनगराच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उप–जिल्ह्यात आहे.

सदर दिनांक २१ जून, २०१७.

सही/–
**(श्री. जे. के. शाह)**
वकील उच्च न्यायालय, मुंबई

## LOST & FOUND

I, MR. MURUGAN KARPAKARAMESH have lost my 1) Tankers Endorsement Certificate No. DCEB/ MMD (M) 2017/5504, 2) Tankers Endorsement Certificate No. DCEB / MMD (M) 2017/5507. I have made Police Complaint for the same, complaint Registration No. 4060/2017 dated 18/06/2017. If anybody founds please contact Mobile No. 9769822759.

## विक्री सूचना
**इ.सी. नं. १२६/२०१७**
**उच्च न्यायालय कलकत्ता येथे सामान्य मूळ नागरी कार्यकक्षा**

**ॲक्सिस बँक लि.**
**विरुध्द**
**मनोहरलाल ॲन्ड कं. ॲन्ड आदर्स**

मा. उच्च न्यायालय कलकत्ता यांनी जारी केलेल्या **दि. १६ मे २०१७** च्या आदेशानुसार एक जॅग्वार कॅट डी मॉडेल गाडी जिचा रजिस्ट्रेशन नं. WB06E/6800 इंजिन नं. 103508PN व चासीस नं. LV03278 आहे व जी पद्मजा एंटरप्रायजेस, हरी ओम कंपाऊंड, कशेळी मारुती मंदिरासमोर, जुना ठाणे भिवंडी रोड, कशेळी टोल नाक्यापुढे, भिवंडी, मुंबई–४२१३०२ येथे पडून आहे, ती विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. सदर कार इच्छुक ग्राहकांना सर्व कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **स. १०.०० ते सायं. ५.००** पर्यंत पाहणीसाठी उपलब्ध आहे. तसेच सदर कारची पाहणी केल्यानंतर वर नमूद केलेल्या आदेशानुसार संभाव्य व इच्छुक ग्राहकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. बयाणा रकमेपोटी खरेदी रकमेच्या २०% रक्कम प्राप्तकर्ता यांच्याकडे जमा केल्याशिवाय सदर प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत. सर्व प्रस्ताव मोहोरबंद लिफाफ्यात घालून अर्हता प्राप्तकर्ता यांच्याकडे **दि. ४ जुलै २०१७** रोजी सायं. **५.०० पूर्वी** सादर करावेत. सदर केसची **दि. ११ जुलै २०१७** ही तारीख मा. न्यायालयाने नेमलेली आहे. सदर कारची विक्री ही मा. उच्च न्यायालय कलकत्ता यांच्या पुष्टीकरणावर अवलंबून राहील. इच्छुक खरेदीदार/ प्रस्तावक विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती, पुढील प्राप्तकर्ता अथवा पुढे नमूद यांच्याकडून मिळवू शकतात–मे. सिन्हा ॲन्ड कं. ॲडव्होकेट्स, ५, किरण शंकर रॉय रोड, कोलकता–७००००१, वेळ स. ११.०० ते सायं. ५.०० (सोमवार ते शुक्रवार)

**सही**
**श्री. रुपचंद चक्रबोर्ती**
**ॲडव्होकेट/प्राप्तकर्ता**
**उच्च न्यायालय कलकत्ता**
**बार असोसिएशन रुम नं. २,**
**मो. नं. ८०१७२२६८३१**

## FEDERAL BANK
YOUR PERFECT BANKING PARTNER

**शाखा : मुंबई/ॲसेट रिकव्हरी**
दी फेडरल बँक लि; मुंबई/ॲसेट रिकव्हरी ब्रांच, ३४, १३ वा मजला, जॉली मेकर चेंबर्स II, नरिमन पॉईंट, मुंबई, महाराष्ट्र–४०००२१.
**दूरध्वनी क्र. :** ०२२–२२८४६६७६, **ई–मेल आयडी :** bbyo@federalbank.co.in
वेबसाईट : federalbank.co.in

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३(१) सहवाचता सरफैसी ॲक्ट, २००२ (ह्यापुढे उल्लेख ॲक्ट म्हणून) च्या कलम १३(२) अन्वये सूचना.**

| | |
|---|---|
| **१. सौ. ताहिराशिरीन मोहम्मदहुसेन शेख** वय ३८ वर्षे, श्री. इम्रान मुश्ताक बागवान यांची पत्नी, घर क्र. ६४, समीर नगर, फकीरवाडा, अहमदनगर–४१४००१ | **२. श्री. इम्रान मुश्ताक बागवान** वय ३८ वर्षे, श्री. मुश्ताक बागवान यांचे पुत्र घर क्र. ६४, समीर नगर, फकीरवाडा, अहमदनगर–४१४००१ |
| **३. श्रीमती फरझाना फकीरमोहम्मद खान,** वय ५५ वर्षे, फकीर मोहम्मद खान यांची कन्या, घर क्र. २१३७, पारशाह खुंट, पिंजार गल्ली, अहमदनगर–४१४००१. | |

मूळ कर्जदार म्हणून तुम्ही क्र. १ आणि क्र. २ व क्र. ३ सह–कर्जदार यांनी बँकेच्या नावे आवश्यक तारण करार/कर्ज दस्तावेज करून आमच्या बँकेच्या **अहमदनगर** शाखेकडून पत सुविधा कर्जाऊ घेतल्या.

बँकेकडून घेतलेल्या उपरोक्त पत सुविधांप्रती तारण म्हणून तुम्ही क्र. १ यांनी खालील स्थावर मिळकतींच्या संबंधात तारणाच्या स्वरुपात बँकेच्या नावे तारण हितसंबंध बनवले:

**गहाण स्थावर मिळकतींचे वर्णन**

ए. भिंगार, अहमदनगर येथे स्थित समीर को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमधील स.क्र. ३४७/२ बी पैकी ३०६ चौ.मी. एरियासह प्लॉट क्र. २५ वरील २६.२९ चौ.मी. बिल्टअप एरियासह ३५.७५ चौ.मी. मोजमापित रो हाऊस ब्लॉक क्र. ४१ धारक ती सर्व अखंड जमीन जिच्या चतु:सीमा पूर्वेस – ब्लॉक क्र. ४०, दक्षिणेस – अंतर्गत कॉलनी रोड, पश्चिमेस – ब्लॉक क्र. ४२ आणि उत्तरेस गल्लीने.
बी. भिंगार, अहमदनगर येथे स्थित समीर को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमधील स.क्र. ३४७/२ बी पैकी ३०६ चौ.मी. एरियासह प्लॉट क्र. २५ वरील २६.२९ चौ.मी. बिल्टअप एरियासह ३५.७५ चौ.मी. मोजमापित रो हाऊस ब्लॉक क्र. ४२ धारक ती सर्व अखंड जमीन जिच्या चतु:सीमा पूर्वेस – ब्लॉक क्र. ४१, दक्षिणेस – अंतर्गत कॉलनी रोड, पश्चिमेस – ब्लॉक क्र. ४३ आणि उत्तरेस गल्लीने.

उपरोक्त तारण आणि गहाण मिळकतींचा यापुढे उल्लेख 'तारण मत्ता', निम्नस्वाक्षरीकार फेडरल बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने तुम्हाला कळवतात की, बँकेच्या अहमदनगर शाखेतील तुमच्या कर्ज खात्यांतर्गत ०२.०६.२०१७ रोजीस रु. ७,३६,१३१/– (रुपये सात लाख छत्तीस हजार एकशे एकतीस मात्र) ची रक्कम तुमच्याकडून संयुक्तपणे आणि वेगवेगळी येणे थकीत आहे. परतफेडीत तुम्ही केलेली कसूर लक्षात घेऊन तुमच्या कर्ज खात्याचे वर्गीकरण आरबीआय मार्गदर्शक तत्त्वानुसार ०२.०५.२०१७ रोजीस नॉन–परफॉर्मिंग ॲसेट असे केले.

तुम्हाला याद्वारे ह्या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत सदर रकमेचे प्रदान प्रदानाच्या तारखेपर्यंतच्या मासिक आधाराने दरसाल १३.५०% दराने पुढील व्याज आणि खर्चासह करण्यास सांगण्यात येते, कसूर केल्यास, बँक ॲक्टच्या कलम १३ अंतर्गत, तुम्हाला पुढील कोणतीही सूचना न देता तुम्ही आणि तुमच्या उपरोक्त तारण मत्तांविरुद्ध भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीद्वारे त्यांचे हस्तांतरण करणे किंवा थकबाकीची रोकड करण्याकरिता तारण मत्तांचे व्यवस्थापन हाती घेणे यासह सर्व अधिकार वापरेल.

हे कळविण्यात येते की, तुम्ही बँकेची लेखी संमती घेतल्याखेरीज वरीलपैकी कोणत्याही तारण मत्तांचे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाही, जर तुम्ही तुमचे दायित्व निभावण्यात कसूर केली आणि बँकेने वरीलप्रमाणे उपाय योजनात्मक कारवाई केली तर तुम्ही त्या संबंधात आलेला सर्व खर्च, आकार आणि परिव्यय देखील बँकेला प्रदान करण्यास बांधील राहाल. तारण मत्तांच्या विक्री रकमेतून संपूर्ण थकबाकी भागली नाही तर पुढे कोणतीही सूचना न देता बँक उर्वरित रकमेची वसुली करण्याकरिता तुमच्याविरुद्ध व्यक्तिगत कारवाई सुरू करेल. तारण मत्तांचे (तारण मिळकती) विमोचन करण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या संबंधात ॲक्टच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधण्यात येते. बँकेला तिची थकबाकी वसूल करण्यासाठी उपलब्ध असलेले अन्य अधिकार आणि उपाययोजनांना बाधा येऊ न देता ही सूचना जारी केली आहे.

**दिनांक : ०२ जून, २०१७**

**दी फेडरल बँकसाठी**
**सुनील शाहू नाईक**
**चीफ मॅनेजर आणि ब्रांच हेड**
**मुंबई/ॲसेट रिकव्हरी**
**(सरफैसी ॲक्ट अन्वये प्राधिकृत अधिकारी)**